**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pu**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary. stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

जा. क्र.रा.म./परीक्षा-३/४३ee
दिनांक -१९/१०/२०२०

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा.संचालक,दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई-४०००३०
४) मा.संचालक,आकाशवाणी ,मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५) मा.संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा.संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

**विषयः-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्य.प्रमाणपत्र (इ.१२वी) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत...**

महोदय,

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्य.प्रमाणपत्र (इ.१२वी) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये आयोजित करावयाच्या परीक्षेची आवदेनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखा संदर्भात प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे. व सर्व मान्यताप्राप्त शाळांच्या व कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस, सस्वीस, राज्यमंडळ, पुणे ४) ग्रंथालय, राज्यमंडळ, पुणे ५) ऑनलाईन विभाग

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय, मुंबई ४०००३२
२) मा. खाजगी सचिव, मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३) मा. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
४) मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
५) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय , पुणे

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) नोव्हेंबर–डिसेंबर २०२०
पुरवणी परीक्षेची **आवेदनपत्रे ऑनलाईन** पध्दतीने **सादर करावयाच्या तारखांबाबत...**

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की,राज्यात कोविड–१९ या विषाणूचा प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन/संचारबंदी जाहीर केली होती व वेळोवेळी सदरचा कालावधी वाढवल्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० परीक्षांचे निकाल माहे जुलै २०२० मध्ये जाहीर झालेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट ऐवजी नोव्हेंबर–डिसेंबर २०२० मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने

**इ.१०वी व इ.१२वी साठी** **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळा,उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार, **दिनांक २०/१०/२०२०** ते गुरुवार, **दिनांक २९/१०/२०२०** | मंगळवार, **दिनांक ०३/११/२०२०** ते बुधवार, **दिनांक ०४/११/२०२०** | गुरुवार, **दिनांक ०५/११/२०२०** |
| विलंब शुल्क | शुक्रवार, **दिनांक ३०/१०/२०२०** ते सोमवार, **दिनांक ०२/११/२०२०** | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळा, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१.श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माहे नोव्हेंबर–डिसेंबर २०२० व फेब्रुवारी.– मार्च २०२१ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

२.ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरतांना फेब्रवारी –मार्च २०२० परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

३.नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

४.सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी शुल्क प्रचलित पध्दतीने मंडळाने निश्चित केलेल्या बॅंकेच्या खात्यामध्ये **Virtual Account** व्दारे जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५.आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारंखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक– १९/१०/२०२०